# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ११/०९/२०२५ ( गुरूवार )**

---

## रामटेक कृषी मेळाव्याच्या निमित्ताने थोर आदिवासी क्रांतिकारक वीर बाबूराव शेडमाके यांच्या जंगोम सेनेचा इतिहास सादर करणारे ‘‘जंगोम’’ नाटकाचे सादरीकरणाबाबत

रामटेक :— **शुक्रवार** दिनांक १२ सप्टेंबर २०२५ रोजी नियोजित रामटेक कृषी मेळाव्याच्या निमित्ताने नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीसांच्या वतीने पोलीस अधिक्षक मा. हर्ष ए पोद्दार यांच्या पुढाकाराने सन १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दात गोंडवनात क्रांतीची मशाल पेटवणारे थोर आदिवासी क्रांतिकारक वीर बाबूराव शेडमाके यांच्या जंगोम सेनेचा इतिहास सादर करणारे आणि वर्तमानातील परकीय शक्तींच्या वेढ्यात अडकलेल्या गोंडवनाचा आढावा घेणारी मराठी नाटक जी डॉ. दंदे फाऊंडेशन निर्मित, हेमेंदू रंगभूमी, नागपूर प्रस्तूत, लेखक प्रवीण खापरे लिखीत व दिग्दर्शक शुभम निकम यांच्या व्दारे दिग्दर्शित **जंगोम या दोन अंकी नाटकाचा विशेष प्रयोग संध्याकाळी ०६:३० वाजता, नेहरू ग्राऊंड, रामटेक या ठिकाणी** आयोजित केला असून परिसरातील नागरिकांना सदर नाटक बघण्याकरिता जास्तीत जास्त संख्येत उपस्थित राहण्याबाबत विनंती करण्यात येते तसेच सर्व प्रिंट आणि डिजिटल मिडीयाचे पत्रकार बंधूना सदर नाटकाच्या प्रसारण व वार्तांकनासाठी कार्यक्रम स्थळी हजर राहण्याची विनंती करण्यात येते.



# रामटेक येथे दिनांक १२/०९/२०२५ रोजी होणाऱ्या कृषी मेळाव्याच्या अनुषंगाने वाहतुक वळविल्याबाबत

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत रामटेक येथे दिनांक १२/०९/२०२५ रोजी कृषी मेळावा कार्यक्रम हा नेहरू ग्राउंड रामटेक येथे आयोजित करण्यात आलेले आहे. सदर कार्यक्रमामध्ये रामटेक येथील स्थानिक शेतकरी तसेच आजुबाजुच्या गावातील बहुसंख्य शेतकरी उपस्थित राहण्याची शक्यता आहे. कार्यक्रम आयोजित करण्यात करण्यात आलेले स्थळ हे हायवे लगत असल्याने वाहतुक अडथळा निर्माण होण्याची तसेच एखादा गंभीर अपघात होवून कायदा व सुव्यवस्था निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सर्वसामान्य नागरिकांची सुरक्षा व वाहतुक सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीकोणातून तसेच अपघाताची शक्यता टाळण्याच्या अनुषंगाने वाहतुकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतुकीची कोंडी निर्माण होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये, तसेच रोडवर गंभीर व प्राणांकित अपघात होवू नयेत याकरीता मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशान्वये **दिनांक १२/०९/२०२५ चे सकाळी ०९.०० ते रात्री ११.०० वा. पर्यंत** खालील प्रमाणे वाहतुक वळविण्यात आली आहे.

- **तुमसर कडुन रामटेककडे येणारे जड/अवजड वाहने घोटीटोक येथुन अरोली मार्गे—निमखेडा फाटा—तुमान—निमखेडा—तारसा— कन्हान—नागपूरकडे**

- **तुमसर कडुन रामटेककडे येणारे जड/अवजड वाहने घोटीटोक—पंचाळा—मांद्री—मुसेवाडी—नायबी—महाराजपुर—मुखनापूर—चोरबावली मार्गे—नागपूर ते जबलपूर हायवेकडे**

- **नागपूर कडून तुमसरकडे जाणारे जड/अवजड वाहने मौदा टि पॉईंट मार्गे हमलापुरी फाटा—हमलापुरी—काचुरवाही—मसला—घोटीटोक— तुमसरकडे**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द
## पो.स्टे. बोरी ची कारवाई
## ( एकूण ४ आरोपींवर गुन्हा नोद, एकूण २,४९,८००/— रू. चा मुद्देमाल जप्त)

पोलीस स्टेशन बोरी :— दिनांक **१०/०९/२०२५ रोजी रात्री १२:०० वा. च्या दरम्यान रात्रपाळी अधिकारी सपोनि लाकडे यांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा वाकेश्वर शिवार** या ठिकाणी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे सपोनि लाकडे सोबत पोलीस स्टॉफ पोहवा/१८८७ अरविंद चव्हान, पोशि/२३१६ यांनी पंचासह घटनास्थळी धाड टाकली असता आरोपी नामे **१.आकाश अरूण मुर्खे वय २८ वर्ष रा. सावंगी २.प्रज्वल किसन थुल वय २६ वर्ष रा. वारंगा ३.गिरीधर रामभाउ उईके वय ३९ वर्ष रा. परसोडी असे ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना प्रत्यक्ष मिळून आले व वाहन क्रं. एमएच ४९ ई ६७२४ चा चालक मालक पोलीसांना बघून घटनास्थळावरून फरार झाला.** आरोपीतांच्या ताब्यातुन व घटनास्थळावरून ५२ तास पत्ते व डावावरील नगदी ८००/रूपये, एकूण ०२ मोबाईल फोन कि.अं. ९०००/— रूएक मोसा एमएच ४० बिझेड ६५७० कि.अं. ४०,०००/— रू आणि मारोती कंपनीची सेलेरियो कार क्र.एमएच ४९ एई ६७२४ कि. २,००,००० रू **असा एकुण २,४९,८००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नमुद ४ आरोपीतांविरूध्द** पोलीस स्टेशन बोरी येथे कलम १२ महा. जुगार प्रतिबंध कायाद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द
## पो.स्टे. नरखेड ची कारवाई
## ( एकूण ४ आरोपींवर गुन्हा नोद, एकूण ५८,७००/— रू. चा मुद्देमाल जप्त)

पोलीस स्टेशन नरखेड :— दिनांक **१०/०९/२०२५ रोजी सायं ०७:०० वा. च्या दरम्यान पो. स्टे. नरखेड येथे गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मोहदी दळवी रोड**या ठिकाणी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे नरखेड पोलीसांनी पंचासह घटनास्थळी धाड टाकली असता आरोपी नामे **१) आशिष नत्थुजी काटे वय**

**२९ वर्षे रा.वार्ड क्र ९ अमृत नगर नरखेड जि.नागपुर २) प्रशांत ज्ञानेश्वर वाघे वय ५६ वर्षे रा. वार्ड क्र ८ गोपाळ पेठ नरखेड जि.नागपुर ३) सचिन चंद्रभान गोंडाणे वय ३४ वर्षे रा.वार्ड क्र ३ अंडेलीपुरा नरखेड जि.नागपुर ४) शैलेंद्र महादेव गजभिये वय ४५ वर्षे रा.वार्ड क्र ५ सिध्दार्थ नगर नरखेड असे ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना प्रत्यक्ष मिळून आले.** आरोपीतांच्या ताब्यातुन व घटनास्थळावरून ५२ तास पत्ते, नगदी १३५००/— रुपये, पिवळया रंगाची एक नॉयलॉन ताळपत्री किं.अं. २००/— रू., एक बजाज कंपनीची दुचाकी क्र. एम.एच. ४०/सि.पी.६१७२ कि.अं. ४५०००/— रु **असा एकुण ५८,७००/— रू. चा** मुद्देमाल जप्त करण्यात आला. नमुद **४ आरोपीतांविरूध्द** पोलीस स्टेशन नरखेड येथे कलम १२ महा. जुगार प्रतिबंध कायाद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या सट्टापट्टी लिहून जुगार चालवून खायवाडी करणाऱ्या आरोपीविरूध्द स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

स्थानिक गुन्हे शाखा :— दिनांक **१०/०९/२०२५ रोजी रात्री २०:०० वा. च्या दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी सपोनि विजयसिंग चनौर** हे स्टॉफ सह पो.स्टे. कळमेश्वर हद्दीत गस्त करित असता त्यांना **कळमेश्वर बस स्टॉप जवळील दर्ग्याजवळ एक इसम सट्टापट्टी लिहून पैशाची खायवाडी करून जुगार चालवित असल्याची गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाल्याने** सपोनि चनौर यांनी सोबत पोलीस स्टॉफ व पंचासह घटनास्थळी धाड टाकली असता आरोपी नामे **विनोद जानराव ढोक वय ४० वर्ष राहणार वार्ड क्रमांक — २, ब्राह्मणी ता — कळमेश्वर हा घटनास्थळी हजर मिळून आला,** पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता आरोपीच्या ताब्यातून वरळी मटका क्रमांक लिहिलेला एक पांढरा कागद, एक निळ्या रंगाचा शाईचा पेन किं.अं. ०१/रू. आणि २१५०/— रुपये रोख **असा एकूण किमती २१५१/— रु. चा** मुद्देमाल जप्त करून पो.स्टे. कळमेश्वर येथे नमूद आरोविरूध्द कलम १२(अ) महा. जुगार प्रतिबंध अधिनियमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला

## अवैधरित्या सट्टापट्टी लिहून जुगार चालवून खायवाडी करणाऱ्या आरोपीविरूध्द पो.स्टे. कळमेश्वर ची कारवाई

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक **१०/०९/२०२५ रोजी** रात्री २०:०० वा. च्या दरम्यान कळमेश्वर पोलीसांना **कळमेश्वर बस स्टॉप जवळील दर्ग्याजवळ एक इसम सट्टापट्टी लिहून पैशाची खायवाडी करून जुगार चालवित असल्याची गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाल्याने** कळमेश्वर पोलीसांनी पंचासह घटनास्थळी धाड टाकली असता आरोपी नामे **संदीप अरूण पटेल वय २९ वर्ष रा. — साई मदीर जवळ, कळमेश्वर हा घटनास्थळी हजर मिळून आला,** पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता आरोपीच्या ताब्यातून वरळी मटका क्रमांक लिहिलेला एक गुलाबी रंगाचा कागद, एक निळ्या रंगाचा शाईचा पेन किं.अं. ०१/रू. आणि १८००/— रुपये रोख **असा एकणू किमती १८०१/— रु. चा** मुद्देमाल जप्त करून पो.स्टे. कळमेश्वर येथे नमूद आरोविरूध्द कलम १२(अ) महा. जुगार प्रतिबंध अधिनियमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला

## अवैधरित्या देशी, विदेशी आणि मोहफुलाची दारू बाळगणाऱ्या / विक्री करणाऱ्या आरोपीतांवर नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई (एकूण ४ आरोपीविरूध्द ४ गुन्हे नोंद. एकूण ६९,४६० /— रू. चा मुद्देमाल जप्त)

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक १०/०९/२०२५ रोजी **पो.स्टे. काटोल** येथील पोलीस स्टॉफ ने **मिळालेल्या खात्रीशीर गुप्त बातमीवरून दुचाकीवरून अवैधरित्या विक्रीच्या उद्देशाने विदेशी दारू ची वाहतूक करणाऱ्या** महिला आरोपीस पो.स्टे. काटोल हद्दीतील **सुनिल नगर, सावरगाव रोड** या ठिकाणी थांबवून पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता ROYAL STAG DELUXE WHIKY असे लेबल असलेल्या **विदेशी दारूच्या एकूण १२ निपा कि. ३,०००/— रू.** विनापरवाना वाहतूक करतांना प्रत्यक्ष मिळून आल्याने नमूद दारू व दुचाकी मोपेड गाडी क्र. एम. एच. ४०/सि.झेड —६४५९ कि. ६०,०००/— रू. **असा एकूण किं. ६३,०००/— रू. मुद्देमाल** जप्त करून आरोपी महिलेविरूध्द कलम ६५(ई), ६५(अ) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला.

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक १०/०९/२०२५ रोजी **पो.स्टे. केळवद** येथील पोलीस स्टॉफ ने **मौजा केळवद** येथे अवैधरित्या देशी दारू विक्री करणारा आरोपी नामे **कैलाश मारोती बुरलेवार वय ४५ वर्ष रा. वार्ड क्र. ५ केळवद ता. सावनेर जि.नागपुर** याचे वर छापा टाकून कारवाई केली असता आरोपी कडून एकूण **किंमती ४७६०/— रू. ची देशी दारू संत्रा भिंग्री जप्त करून** आरोपीविरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला.

**पोलीस स्टेशन पारशिवनी** :— दिनांक १०/०९/२०२५ रोजी पोलीस स्टेशन पारशिवनी येथील पोलीस स्टॉफ ने पो.स्टे. पारशिवनी हद्दीतील मौजा **पेंढरी या** ठिकाणी मिळालेल्या गुप्त बातमीच्या आधारे अवैधरित्या देशी दारू बाळगुन विक्री करणाऱ्या आरोपींवर छापा टाकूण **एकूण कि. ९००/— रू. ची देशी दारू भिंगरी संत्रा जप्त करून** एका महिला आरोपी विरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केलेला आहे.

**पोलीस स्टेशन खापा** :— दिनांक १०/०९/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन खापा येथे** मिळालेल्या गुप्त बातमीवरून खापा पोलीसांनी पो.स्टे. खापा हद्दीतील मौजा **कोच्छी** येथे अवैधरित्या मोहफुलाची गावठी दारू जवळ बाळगुन विक्री करणारा आरोपी नामे **जयराम तुकाराम सहारे वय ६१ वर्ष रा.कोच्छी ता.सावनेर जि.नागपुर** याचे वर छापा टाकून त्याचे जवळून एका पांढऱ्या रंगाच्या कॅनमधून ८ लिटर मोहफुलांची हातभट्टीची गावठी दारू **किंमती ८००/— रू. ची दारू जप्त करून** आरोपीविरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला.

**(अशाप्रकारे एकूण ०४ आरोपीविरूध्द ०४ गुन्हे नोंद व एकूण ६९,४६० /— रू. चा मुद्देमाल जप्त)**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**